# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता सहावी : पूर्व चाचणी

**इयत्ता : सहावी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................ **हजेरी क्र. :** ..................

**शाळेचे नाव :** ........................................ **दिनांक :** ..................

**प्र. १) खालील उतारा वाच आणि उताऱ्यावर आधारित कृती सोडव. (5.01.06)** **(५ गुण)**

*सायंकाळ झाली. झुगी अभ्यास करत बसली होती. झोपडीबाहेर कोकरू बांधले होते. झोपडीत येऊन आईने चुलीवर भात शिजायला ठेवला. झुगीला भाताकडे लक्ष ठेवायला सांगितले आणि विहिरीवर पाणी आणायला गेली. तेवढ्यात कोकराचा बँऽऽ बँऽऽ असा ओरडण्याचा आवाज आला.*

१) झुगी काय करत होती? ..................................................

..................................................

२) आईने झुगीला कशाकडे लक्ष ठेवायला सांगितले? अचूक पर्यायावर (✓) खूण कर.

अ) कोकराकडे ब) झोपडीकडे क) अभ्यासाकडे ड) भाताकडे

३) आई कोठे गेली? ..................................................

४) कोकरू का ओरडू लागले असेल, असे तुला वाटते का? ..................................................

..................................................

५) खालील शब्द अकारविल्हेनुसार लाव व शब्द पुन्हा लिही. (5 01.07)

झोपडी, सायंकाळ, भात, कोकरू, चुलीवर, विहीर

..................................................

**प्र. २) खालील जाहिरात वाच व त्यावरील कृती सोडव. (5.01.04)** **(५ गुण)**

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे आलेल्या पुरामुळे ५० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यांपैकी ११ लोकांचा मृत्यू एकट्या रत्नागिरी शहरात झाला आहे, अशी माहिती गुरुवारी राज्य सरकारकडून देण्यात आली. मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे; तसेच नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. ज्यांच्या घराचे पूर्णपणे नुकसान झाले आहे, त्यांना नवीन घर दिले जाईल. जर घराचे अर्धवट नुकसान झाले असेल, तर दुरुस्तीसाठी आर्थिक साहाय्य केले जाईल.

वरील बातमीतील पूरग्रस्तांना मदत होण्यासाठी काय करता येईल, असे तुला वाटते?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

**प्र. ३) खालील शब्दांचा उपयोग करून गोष्ट लिही. (05.01.09)** **(५ गुण)**

गाव... आजी... सैनिक... पत्र... शहीद... संदेश... सन्मान.

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

**प्र. ४) खालील परिच्छेद वाच आणि योग्य ठिकाणी विरामचिन्हे देऊन पुन्हा लिही. (05.01.10)** **(३ गुण)**

आपली संस्कृती कृषी संस्कृती आहे आपले सण समारंभही कृषीशी निगडित आहेत शेतकरी ऊन पाऊस वारा यांची पर्वा न करता शेतात काबाडकष्ट करतो त्याला शेतात अनेक प्रकारची कामे असतात उदा नांगरणी पेरणी कोळपणी इ.

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

**प्र.५) खालील विषयांवर प्रत्येकी एक एक घोषवाक्य तयार कर. (05.01.09)** **(२ गुण)**

झाडे : ..........................................................................................

पाणी : ..........................................................................................

**प्र. ६) खालील वाक्य कोणत्या काळातील आहे ते लिही. (05.01.10)** **(३ गुण)**

१) सविता शाळेत गेली :..........................................................................

२) अपेक्षा खो-खो खेळेल : ......................................................................

३) सायली अभ्यास करते : ......................................................................

**प्र. ७) कंसातील क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिही. (05.01.10)** **(२ गुण)**

१) निखिलने वाढदिवसाला नवीन कपडे (घालणे) :

..........................................................................................

२) उद्या मी शाळेत लवकर (येणे) :

..........................................................................................

**प्र. ८) तुमच्या परिसरातील व्यावसायिक/कारागीर यांची मुलाखत घेण्यासाठी पाच प्रश्न तयार कर व लिही. (05.01.13)** **(५ गुण)**

१) ..........................................................................................

२) ..........................................................................................

३) ..........................................................................................

४) ..........................................................................................

५) ..........................................................................................